दि. १९ मार्च २०१८

# ठाणे महानगरपालिका ठाणे

## सन २०१८-१९

## महापालिका आयुक्त श्री.संजीव जयस्वाल यांचे अर्थसंकल्पाबाबत निवेदन

मा.महापौर व सन्माननीय सदस्य,

ठाणे महानगरपालिकेतील माझ्या कार्यकालातील ठाणे शहराला प्रगतिपथावर नेणारा चौथा अर्थसंकल्प सादर करताना मला खूप आनंद होत आहे. ठाणे शहराचा कायापालट करणारा हा अर्थसंकल्प सादर करताना गेल्या तीन वर्षात शहराचा जो चेहरामोहरा बदलला आहे ते पाहता पुढील आर्थिक वर्षात नव्या जोमाने काम करणे आवश्यक आहे असे माझे मत आहे. त्यासाठी या अर्थसंकल्पात जागतिक पातळीवर राबविण्यात आलेले प्रकल्प घेण्याचे प्रस्तावित असून ठाणे शहर महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या स्तरावर नावलौकिकास येईल याबाबत शंका नाही.

ठाणे महानगरपालिकेने गेल्या तीन वर्षात विविध क्षेत्रांमध्ये भरीव आणि कल्याणकारी वाटचाल केली आहे. महानगरपालिकेने अनन्यसाधारण (Out of Board) विविध प्रकल्प राबवून राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील ॲवॉर्डस मिळविलेले असून ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू हा नेहमीच ठाणे शहराचा संपूर्ण व सर्वांगीण विकास राहिला आहे. ठाणे महानगरपालिकेने गेल्या तीन वर्षात केलेली विकास कामे, रस्ता रुंदीकरण, बाधितांचे पुनर्वसन, समाज विकासाच्या विविध योजना, ५ लक्ष वृक्ष लागवड, मलनि:सारण प्रकल्प इत्यादी क्षेत्रात चमकदार कामगिरी केली असल्याने ठाणे महानगरपालिका ही राज्यातील अग्रेसर महानगरपालिका म्हणून गणली

जात आहे. तसेच भारतातील अग्रगण्य क्रिसिल रेटींग कंपनीकडून ठाणे महानगरपालिकेस AA(-) वरुन AA असे उन्नत पतमानांकन (Credit Rating) प्राप्त झालेले आहे. स्मार्ट सिटी, अमृत योजना हे केंद्र शासनाचे प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याचे काम सुरु असून पुढील वर्षी या योजनांची कामे प्रत्यक्षात दृष्टीपथात येतील. ठाणे महानगरपालिकेने गेल्या तीन वर्षात उत्पन्न वाढीचे उच्चांक नोंदविले असून त्यामधून विविध विकास कामे करणे शक्य झाले आहे. ठाणे महानगरपालिकेने Digital India अंतर्गत DigiThane प्रकल्प प्रत्यक्ष कार्यान्वित केलेला असून या माध्यमातून शासन ते नागरिक तसेच नागरिक ते नागरिक आणि व्यावसायिक व व्यापारी उत्पादक ते नागरिक यातील अंतर कमी होऊन नागरिकांना महानगरपालिकेच्या सेवांचा घरबसल्या लाभ घेणे सोयीचे होणार आहे. सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिकेचा विकास पाहता नजिकच्या सर्व महानगरपालिकासुद्धा ठाणे महानगरपालिकेने केलेल्या कामांचे अनुकरण करीत आहे असे म्हणण्यास वाव आहे. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मी एवढेच सांगू इच्छितो की, मागील तीन वर्षात सुरु असलेली सर्व कामे पूर्ण झाल्यावर ठाणे शहरातील प्रत्येक नागरिकांचा हॅपिनेस इंडेक्स वाढलेला असेल. सन २०१७-१८ च्या सुधारित व सन २०१८-१९ च्या मूळ अर्थसंकल्पातील जमा व खर्चाच्या महत्त्वाच्या बाबींवर मी आता भाष्य करणार आहे.

या अर्थसंकल्पामध्ये कोणतीही कर वाढ प्रस्तावित नसून प्राप्त उत्पन्नाच्या स्त्रोतापासून जास्तीत जास्त वसुलीवर भर देऊन उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

मालमत्ता कर

सन २०१७-१८ साठी मालमत्ता कराचे शासकीय करासह उत्पन्न **रु.५५० कोटी**वरुन **रु.४८० कोटी** सुधारित केले असून सन २०१८-१९ मध्ये मूल्यनिर्धारण न झालेल्या मालमत्तांचे GIS सर्व्हेद्वारे मूल्यनिर्धारण करुन कराची आकारणी करण्यात येणार असल्याने मालमत्ता करात वाढ होणार असल्याने मालमत्ता करापासून **रु.६०० कोटी** जमा प्रस्तावित आहे.

विकास व तत्सम शुल्क

सन २०१७-१८ साठी विकास शुल्क व तत्सम शुल्कापासून मिळणारे उत्पन्न **रु.६९० कोटी**वरुन **रु.६३२.८३ कोटी** सुधारित केले असून सन २०१८-१९ मध्ये अभय योजना व प्रशमित संरचना शुल्क नव्याने प्राप्त होणार असल्याने विकास व तत्सम शुल्कापासून **रु.७३७ कोटी** जमा प्रस्तावित आहे.

**वस्तू व सेवाकर अनुदान** १ जुलै २०१७ पासून शासनाने स्थानिक संस्था कर रद्द करुन वस्तू व सेवा कर (GST) लागू केल्याने महानगरपालिकेस होणा-या नुकसान भरपाई पोटी शासनाकडून अनुदान प्राप्त होत आहे. थकीत स्थानिक संस्था करापासून मिळणारे उत्पन्न गृहीत धरुन वस्तू व सेवा करापासून **रु.७७० कोटी** उत्पन्न सुधारित करुन **रु.८९३.३१ कोटी** प्रस्तावित आहे. सन २०१८-१९ मध्ये वस्तू व सेवा कर अनुदान व थकित स्थानिक संस्था करापासून **रु.८११ कोटी** जमा प्रस्तावित आहे.

**पाणी पुरवठा आकार** सन २०१७-१८ करीता पाणी पुरवठा आकारापासून मिळणारे उत्पन्न **रु.१२५ कोटी**वरुन **रु.११० कोटी** सुधारित केले असून सन २०१८-१९ मध्ये स्मार्ट सिटी मधून स्मार्ट मिटरींग पध्दतीने पाणी पुरवठा करण्यास मान्यता मिळाली असल्याने यापासून **रु.१५५ कोटी** जमा प्रस्तावित आहे.

**रस्ते खोदाई फी** सन २०१७-१८ करिता रस्ते खोदाई फी **रु.११२ कोटी**वरुन **रु.१०० कोटी** सुधारित केलेली असून सन २०१८-१९ मध्ये यापासून **रु.१२५ कोटी** जमा प्रस्तावित आहे.

**अग्निशमन फी** सन २०१७-१८ करिता अग्निशमन विभागाकडून फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस व फायर प्रिमियम चार्जेस पासून मिळणारे उत्पन्न **रु.९४ कोटी**वरुन **रु.८२.२२ कोटी** सुधारित केले असून सन २०१८-१९ मध्ये यापासून **रु११० कोटी** जमा प्रस्तावित आहे.

**जाहिरात फी** शहरामध्ये विविध ठिकाणी लावण्यात येणा-या होर्डींग, ॲडपोल, युनीपोल इत्यादीद्वारे प्राप्त होणा-या जाहिरात प्रसिध्दीवरील शुल्कापोटी मिळणारे उत्पन्न सन २०१७-१८ मध्ये **रु.२० कोटी**वरुन **रु.१६ कोटी** सुधारित केले असून सन २०१८-१९ मध्ये जाहिरात फीपासून **रु.२०.७५ कोटी** जमा प्रस्तावित आहे.

**स्थावर मालमत्ता भाडे** महापालिकेच्या स्थावर मालमत्तांच्या भाडयापासून मिळणारे उत्पन्न सन २०१७-१८ मध्ये **रु.२१ कोटी**वरुन **रु.१०.३० कोटी** सुधारित केले असून सन २०१८-१९ मध्ये यापासून **रु.१९.४० कोटी** जमा प्रस्तावित आहे.

अशा प्रकारे महापालिकेच्या सर्व विभागाकडून एकूण २०१७-१८ मध्ये अंदाजित केलेले उत्पन्न **रु.२४७४.४२ कोटी** वरुन **रु.२३७५ कोटी** सुधारित केले असून सन २०१८-१९ मध्ये **रु.२६९० कोटी** एकूण जमा प्रस्तावित केली आहे.

अनुदाने ठाणे महानगरपालिकेला केंद्र शासन, राज्य शासन व इतर शासकीय विभागाकडून प्राप्त होणारे अनुदान सन २०१७-१८ मध्ये **रु.२३३.३६ कोटी** वरुन **रु.१७७.९९ कोटी** सुधारित केले असून सन २०१८-१९ मध्ये **रु.२७९.९८ कोटी** अनुदान प्रस्तावित आहे.

कर्ज व कर्जरोखे सन २०१७-१८ मध्ये कर्ज व कर्जरोख्याद्वारे **रु.५३५ कोटी** अपेक्षित केले होते. परंतु या आर्थिक वर्षात कर्ज उभारण्याची गरज भासली नसल्याने सुधारित अंदाजपत्रकात कर्जापोटी तरतूद कमी करण्यात आलेली असून सन २०१८-१९ मध्ये **रु.४०० कोटी** कर्ज किंवा कर्ज रोखे प्रस्तावित आहे.

वरील प्रमाणे सन २०१७-१८ चे एकूण **रु.३०४७.१९ कोटी** सुधारित जमा अंदाज व सन २०१८-१९ चे **रु.३६९५.१३ कोटी** मूळ जमा अंदाज मा.महासभेस सादर करीत आहे.

पुर्णत्वास आलेले प्रकल्प

➢ मा.हिंदूहृयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक

➢ मिनी स्टेडीयम

➢ जुने ठाणे - नवीन ठाणे थिम पार्क

➢ चिल्ड्रन ट्रॅफिक पार्क

➢ माजिवडा येथील श्रमसाफल्य योजनेंतर्गत इमारत.

➢ स्वातंत्रवीर सावरकर मैदानात खुला रंगमंच, व्यायामशाळा व वाचानलयासाठी बहुउद्देशीय इमारत.

➢ कोपरी येथील लखीमचंद रुग्णालय येथे डायलेसिस सेंटरचे नुतनीकरण.

➢ मुंब्रा येथे अग्निशमन केंद्र

➢ सुभाषनगर येथील पेपर प्रॉडक्ट कंपनीच्या आरक्षित भूखंडावर शाळा

➢ मेंटल हॉस्पीटल परिसरातील ए.सी.सी. कंपनीच्या सुविधा भुखंडावर मल्टी स्पोर्टस मिनी स्टेडीयम

➢ राम गणेश गडकरी रंगायतन नाटयगृहाच्या छतावर कायम स्वरुपी वेदर शेड

➢ वर्तकनगर मधील निळकंठ पाल्म्स येथील आरक्षित भुखंडावर बहुउद्देशीय इमारत

➢ इटर्निटी संकुलाबाजूकडील सर्व्हिस रस्त्यालगत असलेला नाला बंदीस्त करुन पार्किंग व्यवस्था

➢ कौसा विभागात हॉस्पीटलचे आरक्षण असलेल्या जागेत हॉस्पीटल

➢ आकाशगंगा सोसायटी, राबोडी येथील नाल्यावर असलेला अस्तित्वातील जूना पूल तोडून नवीन पूल

➢ घोडबंदर रस्त्यावर तत्वज्ञान विद्यापीठ व आर.मॉल जवळ पादचारी पूल

➢ वर्तकनगर प्रभाग समिती मधील पवारनगर रस्ता ते गावंड बाग ते पोखरण रस्ता क्र.२ पर्यंतच्या रस्त्याचे मंजूर विकास आराखडयानुसार बांधकाम

➢ लोकमान्यनगर सावरकरनगर प्रभाग समिती मधील शास्त्रीनगर नाका ते हत्ती पूल ते लक्ष्मी पार्क पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम

➢ कोपरी येथे जॉगींग ट्रॅकचे नुतनीकरण

➢ सिध्देश्वर तलावाचे सुशोभिकरण

**यापुढे मी खर्चाच्या महत्वाच्या बाबींवर भाष्य करु इच्छितो.**

रस्ते सन २०१५-१६ पासून आजपावेतो शहर विकास विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून विविध रस्ते विकास प्रकल्प मार्गी लावलेले आहेत. कन्स्ट्रक्शन टीडीआरच्या माध्यमातून एकूण ९ रस्ते बांधण्यात येत असून त्यांची एकूण लांबी **६.३२ किमी** आहे. ठाणे महानगरपालिकेने स्वत:च्या निधीमधून गेल्या तीन वर्षात कॉंक्रीटीकरण व यु.टी.ड.ब्ल्यु.टी पध्दतीचे एकूण ९०.२८ **किमीचे** ३०८ रस्ते व २८.०९ **किमीच्या** ३४ डांबरी रस्त्यांची कामे सुरु असून एकूण **२३.३८ किमी** लांबीमध्ये रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहे. तसेच एकूण **५९.५३ किमी** लांबीच्या ५५ मिसिंग लिंक व डि.पी. रस्त्यांची कामे सुरु असून त्यातील **९.८४ किमी** मिसिंग लिंक व डि.पी. रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत अस्तित्वातील रस्त्यांची **लांबी ३५६ कि.मी.** असून, डि.पी व मिसिंक लिंक अंतर्गत व कंन्स्ट्रक्शन TDR च्या माध्यमातून मागील तीन वर्षात नव्याने हाती घेण्यात आलेल्या रस्त्यांची बांधकामे पूर्ण झाल्यानंतर सदर अस्तित्वातील रस्त्यांच्या लांबीमध्ये ६६ कि.मी. ची वाढ होऊन एकूण **४२१.८५ कि.मी.** लांबीचे रस्त्यांचे जाळे उपलब्ध होणार आहे.

सन २०१५-१६ पासून आतापर्यंत रस्ते रुंदीकरण, रस्ते कॉंक्रीटीकरण व मिसिंग लिंक जोडणे , युटीडब्ल्यूटी रस्ते व विकास आराखडयातील रस्ते या कामांसाठी **रु. ५२६.९२ कोटी** निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सन २०१७-१८ मध्ये हाती घेतलेल्या रस्त्यांच्या कामाच्या प्रदानासाठी व सन २०१८-१९ मध्ये नव्याने करण्यात येणा-या रस्ते विकासासाठी **रु.३६३.३० कोटी** अशी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

उड्डाणपूल व पादचारी पूल

कोपरी येथील पुलाच्या रुंदीकरणाचे काम एमएमआरडीएमार्फत लवकरच सुरु करण्यात येणार असून त्यामुळे मुंबईतून मोठया प्रमाणात येणा-या वाहनांमुळे होणारी वाहतूक कोंडी दूर होऊन प्रवासाच्या वेळेची व इंधनाची बचत होणार आहे.

कळवा खाडीवरील पुलाचे काम जलद गतीने सुरु असून सन २०१८ अखेर पूर्ण करुन सदरचा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अर्थसहाय्याने एलबीएस मार्गावरील मिनाताई ठाकरे चौक व अल्मेडा चौक तसेच महात्मा गांधी मार्गावरील संत नामदेव चौक हे उड्डाणपूल पूर्ण होऊन मे २०१८ पर्यंत वाहतुकीसाठी सुरु करण्यात येणार आहेत.

ठाणे शहरामध्ये जुन्या पासपोर्ट ऑफीस समोर, रहेजा कॉम्प्लेक्स समोर, घोडबंदर रोडवर तत्वज्ञान विदयापीठ व आर मॉल समोरील पादचारी पूल पूर्ण झाले असून ब्रम्हांड जंक्शन व कांचन पुष्प सोसायटी समोरील पादचारी पुलांची कामे मार्च २०१९ अखेर पूर्ण होतील अशी खात्री आहे.

ठाणे बेलापूर रस्त्यावरील विटावा व भिवंडी बाहयवळण रस्त्यावर लोढा गृहसंकुल व जुन्या मुंबई पुणे रस्त्यावर आत्माराम पाटील चौक येथे पारसिक चौपाटी समोर पादचारी पूल बांधण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात **रु.१५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

ग्रेड सेपरेटर

तीन हात नाका येथे मोठया प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता त्यावर उपाययोजना करण्यासाठी स्मार्ट सिटी आराखडयात ग्रेड सेपरेटर बांधून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयोजन असून त्यासाठी केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडून निधी उपलब्ध होणार आहे. यासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात **रु.२५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

मुंबई ठाणे मेट्रो प्रकल्प

मुंबई ठाणे दरम्यानचा प्रवास सुखकर होण्यासाठी व मध्य रेल्वे व पूर्व द्रुतगती मार्गावरील वाहतुकीवरील भार कमी करण्यासाठी एमएमआरडीए मार्फत वडाळा- घाटकोपर - तीन हात नाका - कासारवडवली हा १२.४२ कि.मी. लांबीचा मेट्रो ४ प्रकल्प राबविण्यात येणार असून त्याच्या निविदा प्रक्रिया अंतिम झालेल्या आहेत. वडाळा ते कासारवडवली दरम्यान एकूण १२ स्थानके बांधण्यात येणार आहेत.

**ठाणे अंतर्गत मेट्रो प्रकल्प** ठाणे शहराची वाढती वाहतूक समस्या लक्षात घेता २८ कि.मी. लांबीचा अंतर्गत मेट्रो प्रकल्प हाती घेण्यात येणार असून यामध्ये २२ स्थानके बांधण्यात येणार असून यासाठी **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित केली आहे.

**अंतर्गत जलवाहतूक** ठाणे शहराला ३२ किमी लांबीचा खाडी किनारा लाभला असून अंतर्गत जलवाहतुकीचा पर्याय उपलब्ध आहे. त्यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्या सहकार्याने अंतर्गत जलवाहतूक सुरु करण्यासाठी अनुदान प्राप्त होणार असून सदर प्रकल्प महापालिकेच्या माध्यमातून राबविण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**पीआरटीएस** महापालिका क्षेत्रांतर्गत मेट्रो व महामेट्रोचे नेटवर्क विकसित होत असल्याने त्यापर्यंत पोहचण्यासाठी २५ कि.मी.लांबीचे पीआरटीएस पद्धतीचे (Personal Rapid Transit System) फीडर नेटवर्क करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये आवश्यक त्या ठिकाणी स्टेशन निर्मिती करुन ४ ते ६ प्रवासी क्षमता असलेल्या स्वयंचलित पॉड कारच्या माध्यमातून (Battery Operated Pod Car) एकाच दिशेने निश्चित स्थळी विना थांबा सरासरी ४० कि.मी. प्रति तास याप्रमाणे प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध होईल. सदर प्रकल्प टप्प्याटप्प्याने पूर्ण करुन वापरासाठी खुला करण्यात येईल. हे काम PPP तत्वावर अडीच वर्षात पूर्ण करण्याचा मानस आहे.

**सार्वजनिक सायकल प्रकल्प** भारतातील सर्वात पहिला ६०० सायकलींचा संपूर्ण स्वयंचलित सार्वजनिक प्रकल्पाची सुरुवात ठाण्यात होणार असून नागरिकांसाठी अत्यल्प दरात, त्यातही सर्व सभासदांसाठी पहिला अर्धा तास अगदी मोफत असणार आहे. या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी, प्रदूषण, सार्वजनिक वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. या प्रकल्पामुळे किमान १० कोटी रुपयाच्या इंधनाची बचत तर होईलच पण ठाणे शहर अधिक निरोगी व स्वास्थ्यपूरक होईल. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे सायकल चोरीला जाण्यास मज्जाव होईल व संपूर्ण ऐलुमिनिअमची सायकल असल्यामुळे वजनास अत्यंत हलकी व चालविण्यास सोपी आहे. शहरातील विविध ५० ठिकाणी सायकल स्टेशन्सवर ६०० सायकलींची सुविधा उपलब्ध होणार आहे.

**क्लस्टर डेव्हलपमेंट** ठाणे महानगरपालिका हद्दीत जवळजवळ ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत रहात असून ते रहात असलेल्या जागेचा वैयक्तिकपणे विकास करणे केवळ अशक्य असून त्यावर उपाय म्हणजे समूह विकास योजना **(Urban Renewal Scheme).**

ठाणे महानगरपालिकेने समूह विकास योजना राबविण्याचे ठरविले असून ४३ URP चा आराखडा तयार केला असून त्या अंतर्गत १३४८ हेक्टर जमीन या योजनेंतर्गत विकसित होणार आहे.क्लस्टर डेवव्हलपमेंट योजनेंतर्गत ऑक्टोबर २०१८ अखेर एका क्लस्टरचा विकास प्रकल्प सुरु करण्याचे नियोजन आहे.

चौपाटी विकास ठाणे स्मार्ट सिटीच्या माध्यमातून पारसिक, गायमुख, नागलाबंदर, कोलशेत व  बाळकुम येथे चौपाटी विकसित करण्याची कामे सुरु असून त्या व्यतिरिक्त सन २०१८-१९ मध्ये गायमुख ते वाघबीळ पर्यंत वॉक वे व विटावा येथे चौपाटी विकसित करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

इमारती **प्रभाग कार्यालये**

महापालिकेचा वाढता पसारा पाहता सद्यस्थितीतील प्रभाग कार्यालये अपुरी पडत असून वर्तकनगर येथील निहारिका कॉम्प्लेक्स जवळील भूखंडावर व मुंब्रा येथे प्रभाग कार्यालये बांधणे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.६ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**फ्लोटींग मार्केट**

मुंब्रा स्टेशन परिसरामध्ये मोठया प्रमाणात फेरिवाले व इतर व्यापारी रस्त्यावर व्यापार करत असल्याने त्या परिसरात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. तसेच या परिसरातील फेरीवाल्यांना व व्यापाऱ्यांना अन्य ठिकाणी पर्यायी जागा दिली तरी ते त्या ठिकाणी  स्थलांतरीत होत नाहीत. त्यावर उपाय म्हणून सदर फेरीवाल्यांचे व व्यापाऱ्यांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी (In situ) करण्याचे नियोजित असून अपुऱ्या जागेमुळे फ्लोटींग मार्केट तयार करणे आवश्यक असून त्यासाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित केली आहे.

**पार्किंग प्लाझा**

ठाणे स्टेशन परिसरातील वाहतूक कोंडी व पार्किंगची समस्या दूर करण्यासाठी शाहू मार्केट येथील अस्तित्वातील जुनी इमारत तोडून अद्ययावत बहुमजली वाहनतळाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.३ कोटी** तसेच स्मार्ट पार्किंगसाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**उपवन जिमखाना**

महानगरपालिका परिसरामध्ये सुसज्ज असा जिमखाना नसल्याने नागरिकांच्या सोयीसाठी उपवन येथे PPP व महापालिका निधीतून जिमखाना बांधण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**शाळा बांधकाम**

ठाणे महापालिकेच्या ८० शाळा इमारती असून या आर्थिक वर्षात येऊर येथील शाळेच्या वाढीव मजल्याचे बांधकाम व खारेगाव येथील रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या शाळेचे अन्य ठिकाणी पुनर्बांधकाम करण्यासाठी **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**दवाखाने बांधकाम**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात आनंदीबाई जोशी रुग्णालयाचे नुतनीकरण व मुंब्रा प्रभाग समिती मधील शिळ येथे नवीन आरोग्य केंद्र बांधण्याचे नियोजित असून त्यासाठी **रु.१२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**तीन हात नाका मिनी मॉल**

तीन हात नाका परिसरातील स्लिप रोडची निर्मिती व रस्ता रुंदीकरणातील बाधित दुकानदारांचे पुनर्वसन करण्यासाठी मिनी मॉल बांधण्याची निविदा अंतिम टप्प्यात असून लवकरच कामास सुरुवात करण्यात येईल. त्यासाठी **रु.२.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे

स्मशानभूमी व कब्रस्तान विकास

ठाणे शहराच्या मध्यभागी असलेल्या जवाहर स्मशानभूमीचे नुतनीकरणाचे काम CSR फंडातून कच्छी समाजाकडून करुन घेण्यात येत असून जून २०१८ पर्यंत पूर्ण होईल.

वागळे इस्टेट येथे स्मशानभूमी व मुंब्रा येथे कब्रस्तान बांधण्याचे काम सुरु आहे.

सर्व धर्मीय संयुक्त स्मशानभूमी

घोडबंदर रोडवरील भाईंदरपाडा येथे कंस्ट्रक्शन TDR च्या माध्यमातून सर्व धर्मीय संयुक्त स्मशानभूमी विकासकाकडून बांधण्याचे प्रस्तावित आहे.

सुविधा विकसन

**स्ट्रक्चर सुविधा विकसन**

मागील तीन वर्षापासून सुविधांचा विकास शहर विकास विभागामार्फत समावेशक आरक्षण वा बांधीव सुविधांचा विकास कंस्ट्रक्शन TDR च्या मोबदल्याच्या बदल्यात करण्यावर भर देण्यात आला आहे. महानगरपालिकेने सुरु केलेल्या कंस्ट्रक्शन TDR च्या माध्यमातून विविध पायाभुत सुविधा बांधकामाचे **रु.४७५.०३ कोटी** रकमेचे प्रस्ताव हाती

घेतले असून आतापर्यंत **रु.१७.७८ कोटी** रकमेची कामे पूर्ण झालेली आहेत व **रु.३७६.२५ कोटी** रकमेची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच पुढील आर्थिक वर्षात **रु. ८१ कोटी** रकमेची नवीन कामे करण्याचे नियोजन सुरु आहे.

पूर्ण झालेल्या कामांमध्ये पोखरण रोड नं.२ वरील कम्युनिटी पार्क, कळवा पोलीस स्टेशन, कासारवडवली पोलीस स्टेशन, घोडबंदर रोड व पार्श्वनाथ कॉलेज येथे बेघरांसाठी घरे ही कामे पूर्ण झाली आहेत तसेच ज्युपिटर हॉस्पीटल शेजारी पार्किंग प्लाझा, कशीश पार्क येथे पार्किंग प्लाझा व विविध कार्यालयांकरिता बांधकाम, घोडबंदर रोड येथे मेडीटेशन व होलीस्टीक सेंटर, श्रीनगर येथे मॅटर्निटी होम, बाळकूम कोलशेत रोड येथे सेंट्रल पार्क, पोखरण रोड नं.२ येथे कम्युनिटी पार्क, हिरानंदानी इस्टेट येथे Southern पार्क, ब्रम्हांड परिसरालगत Northern पार्क, पोखरण रोड नं.२ येथे जिम्नास्ट सेंटर आणि स्पोर्ट कॉम्प्लेक्स, सिध्दांचल परिसरात नोकरदार महिलांकरीता वसतिगृह, जवाहरबाग स्मशानभूमी विस्तारीकरण व आधुनिकीकरण, बोरीवडे येथे मार्केट व लायब्ररी विकसन, खिडकाळी पोलीस स्टेशन, कोकणीपाडा येथे प्रकल्प बाधितांना घरे, चिरागनगर येथे म्युनिसिपल हाऊसिंग आरक्षणाचे विकसन इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत.

सन २०१८-१९ मध्ये कलर केम कंपनी जवळ अर्बन फॉरेस्ट्री, वॉर मेमोरियल, डोमखार येथे पोलीस स्टेशन, पोखरण रोड नं.२ टी.सी.एस. जवळ सिनियर सिटीझन पॅरेडाईज, कोलशेत येथे रिजनल हेल्थ सायन्स सेंटर, लोढा कोलशेत येथे संकरा नेत्रालय, माजिवडा येथे अग्निशमन केंद्र, ENT हॉस्पिटल, कावेसर येथे टाटा कॅन्सर हॉस्पिटल तसेच घोडबंदर येथे फाऊंटन पार्क इत्यादी कामे कंस्ट्रक्शन TDR च्या माध्यमातून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**सेंट्रल पार्क**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कोलशेत येथे कन्स्ट्रक्शन TDR च्या माध्यमातून सुमारे २५ एकर जागेवर ग्रँड सेंट्रल पार्क विकसीत करण्यात येत आहे. सदर पार्कमध्ये मुघल गार्डन, जपानी गार्डन थीम पार्क, लहान मुलांसाठी खेळ, अँम्पिथिएटर, तलाव, टेनिस व बॅडमिंटन कोर्ट, पार्किंग इत्यादी बाबी विकसीत करण्यात येतील. शहरामध्ये विकसीत होणारी हिरवळ शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी फुफ्फुसांचे (Lungs) काम करणार आहे.

**मॉडर्न स्किल डेव्लपमेंट व सेंटर ऑफ हयुमन एक्सलन्स इन हेल्थ केअर**

महापालिका हद्दीत नर्सिंग व आवश्यक पॅरामेडीकल बाबींच्या शिक्षणाची उत्तम सुविधा उपलब्ध करण्यासाठी लोढा माजिवडा येथील टाऊनसेंटर इमारतीमध्ये अत्याधुनिक व विशिष्ट प्रकारच्या आरोग्यविषयक सेवा पुरविण्यासाठी मॉडर्न स्किल्ड डेव्हलपमेंट सेंटर व सेंटर ऑफ हयुमन एक्सलन्स इन हेल्थ केअर स्थापन करण्यात येत आहे.

**ग्लोबल इम्पॅक्ट हब**

रुस्तमजी टाऊनशिप येथील टाऊन सेंटर मध्ये नव्याने चालू करण्याच्या उद्योग व्यवसायांना प्रोत्साहन देणे व त्याद्वारे ठाणे शहराच्या आर्थिक विकासाला चालना देणे ही संकल्पना अंमलात आणण्याकरिता महापालिकेमार्फत शहरामध्ये ग्लोबल इम्पॅक्ट हब हा उपक्रम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. ग्लोबल इंम्पॅक्ट हबच्या माध्यमातून ठाणे महानगरपालिका शहर व आसपासच्या परिसरातील नागरिकांचे राहणीमान उंचावणे, रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करुन देणे व त्याद्वारे शहराचा एकूण आर्थिक स्तर उंचावण्यासाठी योगदान ठरु शकेल.

**रस्ते सुविधा विकसन**

महापालिकेने कंस्ट्रक्शन TDR च्या माध्यमातून रस्त्याचे **रु.२१८.४९ कोटीचे** प्रस्ताव हाती घेतले असून आतापर्यंत **रु.२.६६ कोटीची** कामे पूर्ण झालेली आहेत व **रु.२१५.८३ कोटीची** कामे प्रगतीपथावर आहेत.

रस्ते विकसनामध्ये म्हाडा कॉलनी जवळ पोखरण रोड नं. १ येथे ४० मी. रुंदीच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून डवलेनगर येथील रस्ता, बोरीवडे येथील रस्ता, हिरानंदानी इस्टेट रस्ता, बाळकुम रस्ता, मुंब्रा-कौसा येथे मुंबई पुणे रोड ते कौसा स्टेडीयम रस्ता, माजिवडा येथे लोढा लक्झरीया कॉम्प्लेक्स ते रुस्तमजी प्लॉट रस्ता, विहंग व्हॅली रस्ता, न्यु हॉरिझोन ते विजय रेसिडेन्सी येथील रस्त्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

**ऑटो डीसीआरची अंमलबजावणी**

ठाणे शहरातील विकासकांना ऑनलाईन पद्धतीने विकास प्रस्ताव सादर करता यावेत व महापालिकेस देय असलेली फी ऑनलाईन पद्धतीने भरता यावी व त्यांच्या प्रस्तावांना विनाविलंब मंजुरी मिळण्यासाठी ऑटो डीसीआरची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. तसेच महानगरपालिकेला प्रत्येक विकासकाची संपूर्ण माहिती संगणकावर संकलित करुन अद्ययावत ठेवणे सोईचे होणार आहे.

**पाणी वितरण व्यवस्था व रिमॉडेलिंग** मागील दोन वर्षामध्ये ठाणे महानगरपालिकेने ४ जलकूंभ बांधण्याची कामे पूर्ण केली असून १६ जलकुंभाची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये एकूण **२५ कि.मी.** लांबीची पाणी वितरण व्यवस्था निर्माण केलेली आहे. सन २०१७-१८ मध्ये कळवा व घोडबंदर परिसरातील पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडेलिंगचे काम सुरु आहे.

**दिवा मुंब्रा पाणी पुरवठा रिमॉडेलिंग** मुंब्रा व दिवा विभागातील वितरण व्यवस्थेचे काम झालेले नसल्याने त्या परिसरातील नागरिकांना पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्या भागात पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडेलिंग करणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पाचा खर्च तीन आर्थिक वर्षामध्ये होणार असून या सर्व कामांसाठी या आर्थिक वर्षात **रु.८० कोटी** तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

**स्काडाद्वारे पाणी नियोजन** महानगरपालिकेने स्काडा यंत्रणेद्वारे पाण्याचे नियोजन करण्याच्या प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्प पुढील दोन वर्षात पूर्ण करुन पुढील सात वर्षे देखभाल दुरुस्तीसह चालविण्याचे नियोजन आहे. यासाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**स्मार्ट मिटरींग** महापालिका हद्दीतील नळ संयोजनांवर स्मार्ट मिटर्स स्मार्ट सिटी योजनेंतर्गत बसविण्यात येणार असून त्याबाबतच्या निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मिटरींग पद्धतीमुळे नागरिकांना आवश्यक प्रमाणात वेळेवर सुरळीतपणे पाणी पुरवठा होणार असून पाण्याचा अपव्यय टाळण्यास मदत होणार आहे.

**टेमघर जलशुध्दीकरण केंद्र**

टेमघर जलशुध्दीकरण केंद्रातील क्लॅरीफ्लॉक्युलेटरसाठी मुंबई महापालिकेच्या धर्तीवर स्टेनलेस स्टीलच्या नवीन तंत्रज्ञानाचे ब्रिज बसविणेचे काम प्रस्तावित आहे. या कामामुळे जलशुध्दीकरण केंद्राच्या कार्यक्षमता वाढीस मदत होणार आहे. या कामास अंदाजे **रु.१२ कोटी** खर्च अपेक्षित आहे.

**पिसे उदंचन केंद्र**

ठाणे महानगरपालिकेच्या २१० द.ल.लि. क्षमतेच्या पिसे येथील उद्‌चन केंद्रातून कच्चे पाणी पंम्पींग मशिनीव्दारे उचलून टेमघर जलशुध्दीकरण केंद्रात पाईपव्दारे नेण्यात येते. सदर पाणी उचलण्याच्या ठिकाणी पावसाळ्यामध्ये मोठया स्वरुपाची झाडे, लाकूड, प्लास्टीक इत्यादी कचरा जमा होऊन उद्‌चन केंद्राची पाणी उचलण्याची क्षमता कमी होऊन पाणी पुरवठयावर विपरीत परिणाम होत आहे. याचा विचार करुन पिसे येथे मेकॅनिकल स्क्रिन बसविणे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.८ कोटी** खर्च अपेक्षित आहे.

**पाणी गळती उपाययोजना**

ठाणे महानगरपालिका हद्दीत एकूण ४८० द.ल.लि. पाणी पुरवठा होत असून यापैकी सुमारे २०-२५ टक्के पाण्याची गळती होत आहे. याचे प्रमाण कमी करुन महसुली उत्पन्नात वाढ करण्यासाठी पाणी गळतीवर उपाययोजना करण्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**विहिरी व कुपनलिकांवर आर.ओ.प्लान्ट बसविणे**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा पाणी कपातीच्या व शट डाऊनच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विहिरी व कुपनलिकांवर आर.ओ.प्लान्ट बसविण्यात येणार आहे. यासाठी **रु. ३ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**भुयारी गटार योजना टप्पा ४**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर रोड परिसरात भुयारी गटार योजना अस्तित्वात नाही. या भागात मोठया प्रमाणावर नागरी वसाहती असून दिवसेंदिवस नागरीकरण वाढत आहे त्यामुळे सार्वजानिक आरोग्याच्या दृष्टीने या भागात भुयारी गटार योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या अमृत य़ोजनेअंतर्गत महापालिकेस ५०% अनुदान प्राप्त होणार असून उर्वरीत खर्च महापालिकेस करावा लागणार असल्याने यासाठी अमृत योजनेतंर्गत **रु.१०२.३७ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**दिवा मुंब्रा येथे भुयारी गटार योजना**

दिवा मुंब्रा भागात मोठया प्रमाणावर नागरी वसाहती असून नागरीकरण वाढत आहे. या भागात भुयारी गटार योजना अस्तित्वात नसल्याने, सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने सदर योजना हाती घेण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी अंदाजे **रु.२३५ कोटी** खर्च येणार आहे. सदर प्रकल्पाचा खर्च तीन ते चार आर्थिक वर्षामध्ये होणार असल्याने या आर्थिक वर्षात **रु.२५ कोटी** तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

**जल व मलनि:सारण**

**मलवाहिन्याचे हाऊस कनेक्शन**

निवासी, अनिवासी सदनिका झोपडयांच्या मलवाहिन्यांची जोडणी मुख्य मलवाहिनीस करण्याचे काम प्राधान्याने हाती घेण्यात आलेले असून, सन २०१८-१९ या वर्षात मोठया प्रमाणावर ही कामे सुरु करावी लागणार असल्याने या आर्थिक वर्षात **रु.४० कोटी** तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

**सार्वजनिक शौचालये**

मागील तीन वर्षात महानगरपालिकेने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ७९२१ इतकी वैयक्तिक शौचालये बांधलेली आहेत. महापालिका हद्दीत एकूण ९५२० सिट्सची ७५४ शौचालये असून त्यापैकी १०६ शौचालयाची पुनर्बांधणी करण्यात येत असून ३९ शौचालयांची कामे पूर्ण झाली असून ६७ शौचालयाची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच ३२६ शौचालयांची दुरुस्तीची कामे हाती घेतली असून त्यापैकी ३०९ शौचालयांची कामे पूर्ण झाली असून १७ शौचालयांच्या दुरुस्तीची कामे सुरु आहेत. सन २०१८-१९ मध्ये सार्वजनिक शौचालये बांधकामासाठी **रु.१६ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**नाले बांधकाम**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण ७२ मुख्य नाले असून त्याची एकूण लांबी **१५३ कि.मी.** आहे. ठाणे महानगरपालिकेने सन २०१७ पर्यंत सुमारे **८१ कि.मी.** लांबीचे नाले बांधकाम RCC पध्दतीने केलेले असून सन २०१७-१८ मध्ये सुमारे **१३.२७ कि.मी.** नाल्याचे बांधकाम करण्याची कामे मंजूर झालेली आहे. उर्वरीत **५८.८२ कि.मी.** पैकी काही नाल्यांच्या बांधकामासाठी व सुरु असलेल्या कामांसाठी **रु.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

अपारंपारीक ऊर्जा विकास

**वीज निर्मिती व वीज वितरण यंत्रणा उभारणे ( Licensee)**

स्मार्ट सिटीअंतर्गत शहरातील पारंपारिक ऊर्जेचा वापर १०% ने कमी करण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनाकडून निर्धारित करण्यात आलेले आहे. तथापि, सद्यस्थितीत असलेल्या वैधानिक तरतुदींमुळे महापालिकेस अपारंपारिक ऊर्जेचा किफायतशीर व परिणामकारक वापर करण्यामध्ये अडचणी येत आहेत. त्यासाठी महापालिकेने स्वत:ची व नागरिकांनी स्वत:च्या इमारतीवर उभारणी केलेले सौर ऊर्जा प्रकल्प व इतर पारंपारिक ऊर्जेच्या प्रकल्पाचा परिणामकारक वापर करणे शक्य होईल. त्याचबरोबर महापालिकेस कायमचे उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होईल. सदर उपक्रमास शासनाकडून सुध्दा सहाय्य मिळण्याची शक्यता आहे. त्यासाठी पुढील आर्थिक वर्षात रक्कम **रु. २ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

डाटा सेंटर व कमान्ड कंट्रोल रुम

हाजुरी येथे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व महापालिकेच्या सर्व सेवांचे सुयोग्य नियंत्रण करण्यासाठी एकत्रित डाटा सेंटर व कमांड कंट्रोलची स्थापना करण्यात येणार असून सदर प्रकल्प पुढील ८-९ महिन्यात कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

**शहर वाय फाय प्रकल्प** शहरातील सर्व रस्त्यांवर नागरिकांना वायफायद्वारे ८०० kbps स्पीडने इंटरनेट सुविधा मोफत उपलब्ध करुन देण्याचा प्रकल्प एप्रिल २०१८ पासून कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

**डिस्ट्रीक्ट कुलिंग प्रकल्प** युनायटेड नेशनच्या UNEP संस्थेने डिस्ट्रीक्ट कुलिंगची संकल्पना राबविण्यासाठी भारतातील पहिले शहर म्हणून ठाण्याची निवड केली आहे. या अंतर्गत वातानुकुलित यंत्रणेसाठी विजेचा मोठया प्रमाणात वापर करणा-या मॉल्स, रुग्णालये, हॉटेल्स, आय.टी. पार्क इत्यादी संस्थांसाठी डिस्ट्रीक्ट कुलिंगच्या माध्यमातून पारंपारिक ऊर्जेचा वापर सिमित करुन हरित ऊर्जा वायुचे उत्सर्जन कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**डिसॅलिनेशन प्रकल्प** उल्हास नदीच्या क्षारयुक्त पाण्याचे डिसॅलिनेशन करुन पिण्यायोग्य पाणी बनविण्याच्या २० एमएलडी क्षमतेच्या प्रकल्पाचे काम एप्रिल महिन्यापासून सुरु करण्यात येणार असून २२० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प राबविण्याचे नियोजन आहे.

**टायडल पॉवर प्रकल्प** समुद्राच्या भरती ओहोटीमुळे निर्माण होणा-या प्रवाहावर ८ मेगावॅट विज निर्मिती प्रकल्पाचे नियोजन करण्यात आलेले असून प्रथम १ मेगावॅट क्षमतेचा देशातील पहिला प्रकल्प नवीन व अपारंपारिक मंत्रालयाच्या सहकार्याने येत्या वर्षात सुरु करण्याचे नियोजन आहे.

**सोलार डिश** छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयांसाठी विविध आपारंपारिक स्त्रोतांचा वापर करुन रुग्णालयाच्या सेवेसाठी वातानुकुल यंत्रणा तसेच बाष्फ निर्मिती करण्यासाठी यापुर्वीच कार्यादेश देण्यात आले आहेत. सदरचे काम जून २०१८ अखेर पर्यंत पूर्ण होणार असून त्या अंतर्गत जगातील सर्वात मोठी ५०० स्केवर मीटरची सोलार डिश लावण्यात येणार आहे.

**मायक्रोहायड्रो पॉवर** महापालिकेच्या पाण्याच्या पाईपलाईन मध्ये उपलब्ध असलेल्या उर्जेचा वापर करुन एकूण ६० kw विज निर्मिती करण्यासाठीच्या प्रकल्पाचा कार्यादेश देण्यात आलेला अउुन संच बसविण्याचे काम जून २०१८ अखेर पर्यंत पूर्ण होईल.

**जिओ थर्मल ऊर्जा**

महापालिकेचे मुख्यालय, वागळे प्रभाग समिती कार्यालय तसेच राम गणेश गडकरी रंगायतन या इमारतींजवळ तलाव असून त्याचा वापर करुन उपलब्ध होऊ शकणा-या जिओ थर्मल ऊर्जेचा वापर प्रायोगिक तत्वावर या तीनही इमारतींमध्ये वातानुकुलनासाठी करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी आगामी आर्थिक वर्षात रक्कम **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**उपवन तलावावर हायड्रोपोनिक्स**

उपवन तलाव येथील पाण्याचा उपयोग मासळी तयार होत असताना त्यातून निर्माण झालेल्या नायट्रोजनचा वापर करुन फळ, भाज्या तसेच फुलांचे उत्पादन प्रायोगिक तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे तलावातील साठलेल्या पाण्यात ऑक्सीजनचे प्रमाण वाढविणे तसेच मत्स्य, फुले, फळ आणि भाजी  व्यवसाय निर्मिती होऊ शकते. यासाठी आगामी वर्षात रक्कम **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**सेन्सर्स उभारणे**

महापालिका क्षेत्रात ध्वनी व वायू प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन, शौचालये या ठिकाणी विविध तांत्रिक माहिती (पॅरामिटर) संकलित करुन विविध ठिकाणी सेन्सर्स उभे करण्याचे काम आगामी आर्थिक वर्षात हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी आगामी आर्थिक वर्षात रक्कम **रु.३कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

आरोग्य सुविधा

महानगरपालिकेचे ५००  खाटांच्या ४ लाख चौ. फूटांच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामध्ये सन २०१७-१८ मध्ये लेक्चर हॉल, अद्ययावत लायब्ररी, मुख्य शस्त्रक्रिया गृह, आय.सी.यू. परिसर, कार्यालय, नेत्र चिकित्सा विभाग, रुग्णालयामधील पॅसेज, निर्जंतुकीकरण विभाग यांचे नुतनीकरण तसेच डि.सि. व इ.एन.टी च्या बाहयरुग्ण विभागाची निर्मिती करण्यात आलेली असून या रुग्णालयाचा कायापालट झालेला आहे.

सन  २०१८-१९ या आर्थिक वर्षात गायनॅक व सर्जरी विभाग, Preventive and Social Medicine विभाग, वॉर्डस, बालरोग विभाग बांधण्याचे प्रस्तावित आहे. आयसोलेशन वॉर्डचे नुतनीकरण तसेच रुग्णालयाच्या मागील बाजूची संरक्षक भिंत, शितगृहाचे नुतनीकरण करुन शव पेटयांची क्षमता ७२ पर्यंत वाढविण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी **रु.१५कोटी** तरतूद प्रस्तावित आहे. छत्रपति शिवाजी महाराज रुग्णालयातील उपकरणे खरेदीसाठी **रु.२० कोटी** व इतर रुग्णालयांच्या उपकरणे खरेदीपोटी **रु.२५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

घनकचरा व्यवस्थापन

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये शहरातील सर्व मोठया कचरा उत्पादकांनी घनकच-याचे वर्गीकरण करुन ओल्या कच-याची विल्हेवाट स्थानिकरित्या करणे बंधनकारक आहे.

**कचरा प्रक्रिया प्रोत्साहन योजना**

शहरातील लहान कचरा उत्पादकांना कचरा विल्हेवाट करण्यासाठी ऑरगॅनिक वेस्ट कन्व्हर्टर मशीन खरेदीसाठी १०% अनुदान व कच-याचे घनफळ (Volume) कमी करण्यासाठी श्रेडर खरेदी करणेकरिता ५% अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे. ही योजना पहिल्या १०० गृहसंकुल व बल्क जनरेटर्स यांना लागू राहील. कचरा प्रक्रिया प्रोत्साहन योजनेसाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**कच-याची ठिकाणे कमी करणे**

शहरातील मुख्य रस्त्यांच्या कडेला, झोपडपट्टयांच्या शेजारी, बाजारपेठ, सामुदायिक शौचालयाच्या ठिकाणी पडणारा कचरा संकलित करण्यासाठी स्टॅटीक कॉम्पेक्टरच्या माध्यमातून कचरामुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. याकरिता आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**मुख्य प्रवाहात कचरा वेचकांचा समावेश**

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये कच-याचे वर्गीकरण करुन १००% वाहतूक करणे बंधनकारक असून शहरातील झोपडपट्टया व डोंगर उतारावरील वस्त्यांमध्ये ही कामे करण्यात मोठया अडचणी येतात. त्यामुळे कचरा वेचक, स्थानिक महिला बचत गट व महिला मंडळ यांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन कचरा संकलन करण्यात येईल. यामुळे झोपडपट्टी भागातील नाल्यामध्ये पडणारा कचरा कमी होऊन त्या भागात स्वच्छता वाढेल. या करिता **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**शीघ्र व लोकाभिमुख तक्रार निवारण**

स्वच्छ स्वर्वेक्षण २०१८ मध्ये ठाणे महानगरपालिकेस नागरिकांचा मोठया प्रमाणावर सहभाग प्राप्त झाला आहे. सुमारे ४५००० स्वच्छता ॲप डाऊनलोड झालेले आहेत. एवढया मोठया प्रमाणावर ॲप डाऊनलोड झाल्याने नागरिकांच्या विभागाकडून अपेक्षाही वाढलेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांच्या कच-यासंबंधी तक्रारीचे निराकरण शीघ्र गतीने होणे अपेक्षित आहे. याकरिता विभागाने बिट स्वच्छाग्रही पथक योजना आखलेली आहे. सदर योजनेत कचरा वेचकांच्या सहभागाने पर्यावरणभिमुख ई-रिक्षांच्या मार्फत स्वच्छाग्रही पथक निर्माण करुन तक्रारींचे निराकरण शिघ्र गतीने करण्यात येईल. याकरिता सन २०१८-१९ मध्ये **रु.१ कोटी** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

**शास्त्रोक्त पध्दतीने कच-याची विल्हेवाट**

शहरातील ओल्या कच-याची स्थानिकरित्या विल्हेवाट लावणेकामी शहरात ठिकठिकाणी एकूण १०० टनाचे बायोमिथेनायझेशन, मॅकेनिकल कंपोस्टींग व बायोकंपोस्टींगचे २० प्रकल्प व १०० टन क्षमतेचे ३ प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. याकरिता आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये **रु.४० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे तसेच यांत्रिक पद्धतीने कच-यापासून खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी **रु.११कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

महापालिका क्षेत्रात असलेल्या जुन्या क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्याचे प्रस्तावित आहे.

मौजे शिळ येथील वन विभागामार्फत खदानीचे रुपांतर सॅनिटरी लँडफील साईट मध्ये करुन घनकच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येणार असून त्यासाठी **रु१५ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

झोपडपट्टी व चाळीमध्ये स्थानिकरित्या कच-याची विल्हेवाट लावण्याकामी जागेची अडचण विचारात घेता मोबाईल मॅकेनिकल कंपांस्टींगच्या माध्यमातून ओल्या कच-याची स्थानिकरित्या विल्हेवाट लावण्यात येणार आहे. त्यामुळे प्रतिदिन सुमारे २० टन घनकच-याची विल्हेवाट स्थानिकरित्या होईल. या योजनेमुळे शहरात दैनंदिन निर्माण होणा-या एकूण कच-यापैकी साधारणत: १२० ते १५० टन कच-याच्या वाहतुकीवरील खर्चात बचत होईल.

**शहरातील सामुदायिक व सार्वजनिक शौचालय कायापालट योजना**

सदर योजनेअंतर्गत शहरातील सर्व सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांचे तज्ञांमार्फत सर्वेक्षण, करुन त्याचा होणारा वापर, दिव्यांग, बालक व महिला यांना युजर फ्रेंडली, शौचालयांचा परिसर, आवश्यक दुरुस्ती व आवश्यकतेप्रमाणे नविन शौचालय उभारणे व निकषांच्या आधारे कृती आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत करण्यात येईल. याकरीता सन २०१८-१९ मध्ये शौचालय दुरुस्तीसाठी **रु.१० कोटी,** नवीन शौचालयांच्या उभारणीसाठी **रु.१६ कोटी** व सेप्टीक टँक बांधणेसाठी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

उद्यान विकास

उद्यान विभागांतर्गत कासारवडवली जैवविविधता उद्यान, थिम पार्कद्वारे जुने ठाणे नवीन ठाणे, ट्रॅफिक पार्क अशी नवीन उद्याने विकसित केली असून लहान मुलांच्या मनोरंजनासाठी ३० उद्यानांमध्ये खेळणी बसविण्यात येत आहेत. उद्यान व थिम पार्क अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये आरक्षित भूखंडांवर पुढील प्रमाणे पार्क विकसित करण्याची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

- घोलाईनगर ॲडव्हेन्चर पार्क
- लक्ष्मीनगर, चिरागनगर पार्क
- पारसिक रेतीबंदर नूतन बंगला पार्क
- सेवन वंडर्स पार्क,
- एल्डर्स पॅराडाईज पार्क

हॅंगिंग ग्रीन वॉल

ठाणे शहरातील हरित क्षेत्र वाढविण्याच्या हेतूने उड्डाणपूलाच्या पिलर्सना हॅंगिंग ग्रीन वॉल करण्याचे नियोजित असून माजिवडा येथील उड्डाणपूलाच्या पिलर्सवर ग्रीन वॉल तयार करण्याचे काम पूर्ण झालेले आहे.

वृक्षप्राधिकरण

वृक्षप्राधिकरणांतर्गत ५ लक्ष वृक्षलागवड योजना पूर्ण करुन यापुर्वीच्या ४.५ लक्ष वृक्षांमध्ये दुप्पटीने वाढ करण्यात आली आहे. यामुळे स्थानिक प्रजातीमध्ये (Local Species) वाढ होऊन Bio-diversity सह पर्यावरण संवर्धन झाले आहे. तसेच कावेसर, ब्रम्हांड व वाघबिळ येथे Urban Jungle विकसित करुन शहरातील Green Lungs मध्ये मोठया प्रमाणात वाढ केली आहे. या वर्षी एक लक्ष वृक्ष लागवड व एक लक्ष सुगंधी वनस्पती लागवड योजना राबविण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**स्मृतीवन**

मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ घोडबंदर रोड व वन विभागाच्या मुंब्रा येथील मोकळ्या जागेवर स्मृतीवन योजनेतंर्गत एकूण ५१००० वृक्षलागवड करणे प्रस्तावित आहे.

**एक मूल एक झाड योजना**

ठाणे शहरातील विविध शासकीय व खाजगी प्रसुती गृहांमध्ये सन २०१८-१९ मध्ये जन्माला येणाऱ्या प्रत्येक नवजात बालकांच्या पालकांना कुंडीमध्ये लागवड केलेले १ रोप देण्यात येणार असून त्यासाठी ४,००० रोपे आवश्यक असून त्याची लागवड व संवर्धन करण्यात येणार आहे.

पर्यावरण संवर्धन **कांदळवन लागवड**

खाडी किना-यावर जैवविविधता वाढविण्यासाठी कांदळवनाची लागवड करुन त्याचे २० वर्षे कालावधीसाठी जतन, संवर्धन करुन त्यापासून कार्बन क्रेडीट प्राप्त करुन आंतरराष्ट्रीय स्तरावरुन निधी उपलब्ध करता येईल.सन २०१८-१९ साठी खारफुटीची लागवड /कांदळवन लागवडीसाठी **रु.१ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**तलाव सौंदर्यीकरण**

ठाणे शहर हे तलावांचे शहर म्हणून सर्वश्रृत आहे. ठाणे शहरातील बहुतांशी तलावांचे संवर्धन ठाणे महानगरपालिकेद्धारे करण्यात आलेले असून, काही तलाव हे ठाणेकरांच्या मनोरंजनाचे व विरंगुळयाचे ठिकाण बनलेले आहे. ठाणे शहरातील तलावांचे ठाणेकरांशी जिव्हाळ्याचे नाते असून ते अधिक दृढ करण्याकरीता या तलावांच्या ठिकाणी विशेष कार्यक्रम व उपक्रमांचे नियमितपणे आयोजन करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

**अर्बन केअर क्वॉलिटी मॅनेजमेंट प्लान फॉर ठाणे सिटी तयार करणे**

ठाणे शहराचा भौगोलिक विस्तार व रचनेस अनुसरुन ठाणे महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी Weather Monitoring Stations तसेच Air pollution sensor & Air quality display boards उभारणे गरजेचे असून विविध ठिकाणी Biofilters (Moss-culture) Air pollution absorption walls उभारणी करुन ती माहिती संकेतस्थळाशी जोडून व मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून त्यावरील  प्रत्यक्ष वेळेची माहिती सर्वांसाठी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

**खाडीचे पाणी स्वच्छ राहण्यासाठी नाल्याच्या पाण्यावर प्रक्रिया करणे**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातून ठाणे खाडी वाहत आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात अनेक नैसर्गिक व कृत्रिम नाल्यांचे प्रवाह वाहत येऊन या खाडीत मिसळतात. सदर नाल्यांचा मूळ उद्देश हा डोंगराळ भागातील पाणी तसेच नागरी वस्तीतून सांडपाणी वाहून नेणे हा आहे. सद्यस्थितीत नाल्यातील सांडपाण्याची गुणवत्ता ही खालावलेली असल्यामुळे सदर वाहून आलेले सांडपाणी खाडीतील पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम करत आहे. नाल्यातील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन खाडीत सोडण्याचे कार्य व्यवहार्य नसल्यामुळे नाल्यातील प्रवाही पाण्याचे Ozonisation  करुन खाडीत विसर्ग करण्याचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात येत आहे. या प्रकल्पात विविध नाल्यांच्या मुखाशी Ozonisation यंत्रणा कार्यान्वित करुन प्रक्रिया केलेले पाणी खाडीत सोडण्यात येईल. त्यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**वेस्ट रिसायक्लिंग प्रकल्प**

शहरात निर्माण होणा-या कच-याचे विलगिकरण न करता एकत्रित कचरा डंपिंग ग्राऊंडवर नेला जातो. असे करणे योग्य नसल्याने कच-याचे वर्गीकरण करुन त्याच्यावर प्रक्रिया करण्याचे धोरण महानगरपालिकेने राबविले असून सध्यस्थितीत १ टनाचा थर्माकोल पुनर्प्रक्रिया प्रकल्प, २५ टनाचा हॉटेल वेस्ट टू बायोगॅस प्रकल्प तसेच  ड्रायवेस्ट कलेक्शन सेंटर, ई वेस्ट कलेक्शन सेंटर हे प्रकल्प सुरु झाले आहेत.

प्लास्टीकपासून इंधन निर्मिती ,ॲनिमल कॅरॅकसपासून सीएनजी हे प्रकल्प पुढील तीन महिन्यात कार्यान्वित होतील.

कोकोनट वेस्ट पुनर्प्रक्रिया प्रकल्प, प्लास्टीक पिशव्यांना पर्याय म्हणून कागदी पिशव्यांचा पुरवठा इत्यादी प्रकल्प लवकरच कार्यान्वीत करण्याचा प्रयत्न आहे.

**वेस्ट टू एनर्जी प्रकल्प**

डायघर येथे ६०० टनाचा वेस्ट टू एनर्जी प्रकल्प सुरु करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र लवकरच प्राप्त करुन घेण्यात येऊन  हा प्रकल्प  सुरु करण्यात येईल.

**शिक्षण सुविधा**

**स्टुडंट इन्फरमेशन कार्ड**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा लेखाजोखा संगणकीकृत करुन त्या माहितीचे विश्लेषण करुन विद्यार्थी निहाय विविध उपाययोजना सुचविणारी एक महत्वाकांक्षी व्यवस्था अध्यापन संशोधन केंद्राच्या माध्यमातून उभी करण्यात येणार असून प्रत्येक विद्यार्थ्यांची माहिती स्टुडंट इन्फॉरमेशन कार्डमध्ये संकलित करण्यात येणार आहे. यामध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक चाचण्यासंबंधी प्रगतीचा अहवाल तसेच DBT योजनांतर्गत लाभाची माहिती संगणकीकृत करता येईल. अशा प्रकारे शाळा प्रवेशापासून ते शालांत परीक्षेपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध होईल.

**स्मार्ट गर्ल योजना**

शाळेतील मुलींना सर्वार्थाने सक्षम बनवून स्पर्धात्मक युगात आपली स्मार्ट ओळख निर्माण करण्यासाठी तिला नव्या युगाचे कौशल्य शिकविणे ही काळाची गरज आहे. हीच गरज लक्षात घेऊन रोजगाराभिमुख सेवाक्षेत्र तसेच पॅरामेडिकल क्षेत्रातील विविध अभ्यासक्रमाचे शिक्षण या योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**वस्ती शाळा**

शाळाबाह्य मुलांच्या समस्येवर प्रभावी उपाययोजना व्हावी व शहरातील प्रत्येक शाळाबाह्य मूल शिक्षणाच्या परिघात यावे यासाठी वस्ती शाळा हा अभिनव उपक्रम यंदाच्या वर्षापासून सुरु करणे प्रस्तावित आहे. शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना विशिष्ट कालावधीसाठी वस्तीतच औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी व त्यानंतर अशा विद्यार्थ्यांना वस्ती शेजारील ठाणे महानगरपालिकेच्या शाळेत औपचारिक शिक्षणासाठी दाखल करणे ही वस्ती शाळेची मुख्य संकल्पना आहे.

**पालक बंधन योजना**

शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांशी शाळेचे सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी पालकांचा सहभाग वाढविण्यायासाठी पालक बंधन योजना प्रस्तावित आहे.

**विशेष फेरी बस सेवा**

ज्या वस्त्यांमधून महापालिका शाळेत विद्यार्थी येतात त्या वस्त्यांमध्ये परिवहन उपक्रमाच्या नियमित फेऱ्या कमी प्रमाणात असून महापालिकेच्या शाळा नियमित थांब्यापासून लांब अंतरावर आहेत. ही बाब विचारात घेता ज्या वस्तीमध्ये आर्थिक दुर्बल कुटुंब आहेत त्या वस्त्यांपासून महानगरपालिकेच्या शाळेपर्यंत बससेवा सुरु करण्यात येणार आहे.

**टॅब पुरविणे**

महानगरपालिकेच्या शाळेतील आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी क्रमिक अभ्यासक्रम सहजगत्या हाताळता यावा याकरिता सर्व माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी सुमारे ४००० टॅब पुरविण्यात येणार असून हे विद्यार्थी दहावीचे शिक्षण घेईपर्यंत याचा वापर करणार आहेत.

**खेलो इंडिया योजना**

प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये खेळाची रुची निर्माण करुन त्याला प्रोत्साहन व खेळामध्ये सांघिक  भावना निर्माण होण्यासाठी मा. पंतप्रधानांनी खेलो इंडिया हया योजनेची घोषणा केली असून या घोषणेने प्रेरित होऊन ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागानेही क्रीडाबाबतच्या साहसी खेळ व फुटबॉल प्रशिक्षण व शिष्यवृत्ती योजनांचा अंतर्भाव केला आहे.

**क्रीडा गणवेश**

पाचवी ते दहावी च्या सर्व मनपा शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा विषयक जागृकता व सांघिक वृत्ती निर्माण होण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना रंगीत क्रीडा गणवेश देण्याचे प्रस्तावित आहे.

**छात्र सेना**

विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना जागरुक करुन त्यांच्यात स्वयंशिस्त निर्माण करुन NCC कॅडेट कोर्स तसेच भारतीय नौसेना व भूसेनाविषयी (शाळा व्यतिरिक्त वेळेत) प्रशिक्षण देऊन त्यांना आपत्कालिन परिस्थितीचा सामना करण्यासाठी छात्र सेना सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

**संयुक्त प्रकल्प या तत्त्वावर इंग्रजी माध्यमाच्या शाळा**

ज्या शाळांचा पट कमी झालेला आहे अशा महानगरपालिकेच्या शाळा इमारती खाजगी संस्थेला उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर संस्थेमार्फत इंग्रजी माध्यमाच्या SSC बोर्डच्या शाळा त्या इमारतीमध्ये सुरु करुन मनपा शाळेतील ५०% विद्यार्थ्यांना त्या संस्थेमार्फत मोफत शिक्षण देण्यात येईल.

**महिला व बालकल्याण**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ४०० हून अधिक महिलांना रोख रकमेच्या स्वरुपात वैयक्तिक लाभ देण्यात आला असून एकूण १०.७६ कोटी खर्च करण्यात आलेले आहेत. सन २०१८-१९ मध्ये महिला व बालकल्याणाच्या खालील योजना प्रस्तावित आहेत.

**मुलींचा सर्वांगीण विकास**

मुलीच्या जन्माचे स्वागत करण्याच्या उद्देशाने राजकन्या योजना, तिच्या उच्च शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती तसेच मुलीच्या विवाहाकरिता कन्यादान योजना यासारख्या योजनांना गतवर्षी भरघोस प्रतिसाद मिळाला असून या आर्थिक वर्षात देखील सदर योजनांचा समावेश केलेला आहे.

**बालविकास योजना**

महापालिकेच्या शाळांमध्ये बोलक्या भिंती कार्यक्रम बालकायदेविषयक जनजागृती, शाळेतील मुलींना उपस्थिती भत्ता, प्रवासभत्ता, बालसंस्कार केंद्र व चाईल्ड हेल्पलाईन केंद्राची स्थापना या योजनांकरिता आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

**महिलांच्या आरोग्य विषयक**

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या महिलांना अर्थसहाय्य, दुर्धर रोगग्रस्त आजार असल्यास वैद्यकीय मदत, किशोरवयीन मुलींना लैंगिक शिक्षणविषयक उपक्रम, महिलांसाठी सुसज्ज शौचालय निर्मिती, विविध शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालय व सार्वजनिक प्रसाधन गृहामध्ये सॅनिटरी नॅपकीन व्हेडींग मशीन बसविणे.

**महिलांच्या क्षमता वृध्दीगंत करणे**

महिलांना व मुलींना विविध व्यावसायिक उद्योजकाचे प्रशिक्षण, घरकाम करणा-या महिलांना स्मार्ट वर्कर प्रशिक्षण कार्यक्रम, सर्व प्रभाग समिती स्तरावर समुपदेशन केंद्र व विधी सल्लागार केंद्र यासारखे उपक्रम महिलांसाठी सुरु करण्यात आले आहे.

**महिला स्वंयरोजगार उपक्रम**

महिलांना बचत गट सुरु करण्यासाठी आवश्यक साहित्य (रजिस्टर, स्टॅम्प पॅड, मार्गदर्शक पुस्तिका) नोंदणीकृत बचत गटांना अर्थसहाय्य करुन त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी महोत्सवाचे आयोजन व कायमस्वरुपी विक्री केंद्राची निर्मिती करुन रोजगारासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात ६० वर्ष व ६० वर्षावरील ज्येष्ठ महिलांना उदरनिर्वाहासाठी अनुदानाची तरतूद केली असून विधवा महिलांसाठी जिजामाता आधार योजनेअंतर्गत अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे. महापालिका हद्दीत प्लास्टीकचा वापर कमी व्हावा यासाठी नागरिकांना कापडी पिशव्या उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे. सदर कापडी पिशव्या महिला बचत गटाच्या माध्यमातून तयार करुन घेण्याचे नियोजन आहे.

महिला व बालकल्याण योजना राबविणेसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात **रु.३७ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**दिव्यांग व्यक्ती विकास**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात महापालिका हद्दीतील ३७४४ दिव्यांग व्यक्तींनी प्रत्यक्ष वैयक्तिक लाभ घेतला असून एकूण **रु.७.२३ कोटी** खर्च करण्यात आलेले आहेत. सदर कल्याणकारी योजनांमध्ये सर्वांगीण बाबींचा समावेश असून दिव्यांग व्यक्तींमधील सर्व घटकांना सामाजिक न्यायाच्या भावनेतून त्यांना उदरनिर्वाह, व्यवसाय, वैद्यकीय उपचार, बेरोजगार भत्ता, असा लाभ देण्यात आलेला आहे.

दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजनेअंतर्गत सर्व घटकांची समावेशक योजना प्रस्तावित करतांना कोणताही घटक दुर्लक्षित राहणार नाही. तसेच सामाजिक न्याय हा सर्वसमावेशक असेल या उदात्त भावनेतून दिव्यांग व्यक्ती, कुष्ठरुग्ण, अंध व्यक्ती, दिव्यांग शालेय विद्यार्थी, दिव्यांग खेळाडू, बेरोजगार दिव्यांग युवक, दिव्यांग ज्येष्ठ नागरिक यांचे जीवनमान उंचविण्याच्या उद्देशातून प्रत्येक घटकानुसार योजना प्रस्तावित करण्यात येत

आहेत. स्वयं रोजगारासाठी अर्थ सहाय्य देणे, अस्तित्वातील स्टॉल ची दुरुस्ती करणे, दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कृतीशीलतेमध्ये सुलभता निर्माण व्हावी यासाठी व्हिलचेअर उपलब्ध करुन देणे. स्पर्शज्ञानाच्या आधारे दिव्यांगामध्ये पर्यावरण जनजागृती निर्माण करणे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधा निर्माण करणे, विविध स्पर्धा घेणे. स्वतंत्र व्यायामशाळा उभारणे, विरंगुळा केंद्र तयार करणे, सेन्सर उद्यान निर्मिती करणे, अभिनय व कला कौशल्य केंद्र सुरु करणे, प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम राबविणे तसेच ठाणे परिवहन सेवेच्या बसमध्ये दिव्यांगाकरिता देण्यात येणा-या सवलतीची तोटयाची भरपाई करणे व यासारख्या इतर योजना राबविण्यात येणार आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात दिव्यांगासाठी जागेच्या उपलब्धतेनुसार दिव्यांगाचे नवीन स्टॉल निर्मिती करणे नियोजित आहे. दिव्यांगांच्या कल्याणकारी योजनांसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात **रु.१८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**कर्मचारी कल्याण योजना**

ठाणे महानगरपालिकेतील वर्ग १ ते वर्ग ४ मधील सर्व कर्मचा-यांच्या वार्षिक वैद्यकीय चाचणीसाठी ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मोठया १० रुग्णालयाचे (ज्युपिटर, बेथनी, कौशल्य, सफायर इत्यादी) पॅनल तयार करुन प्रत्येक कर्मचा-याला वार्षिक रु.३,५०० इतकी रक्कम वैद्यकीय तपासणीसाठी अदा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. यासाठी अंदाजपत्रकात **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण अधिनियमातंर्गत वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी व कर्मचा-यांच्या कुटुंबासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याचे प्रस्तावित असून त्यांच्या उच्च शिक्षणासाठी IIM, IIT, VJTI या संस्थेमध्ये स्पॉन्सरशीप देण्यात येणार आहे. या दोन्ही योजनांसाठी कामगार कल्याण निधी या लेखाशिर्षांतर्गत **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

ठाणे महानगरपालिकेतील सर्व अधिकारी कर्मचा-यांसाठी राज्य शासनाच्या धर्तीवर गटविमा योजना लागू करण्याचे प्रस्तावित आहे.

**विशेष प्रकल्प**

समाजातील प्रत्येक माणसाच्या मनातील आनंद हा सामाजिक प्रगतीचा मापदंड मानला जातो. लोकांना जीवनात आनंदी ठेवण्यासाठी शासकीय योजना राबविण्यात येतात. माणसाला समाधानकारक जीवन जगण्यामध्ये विविध समस्या येतात. त्या समस्यांचे मुख्य घटक समजून घेऊन सुयोग्य अशा योजना व कार्यक्रमाची आखणी करता येते. समाधानकारक जीवन,

सुरक्षा, पर्यावरणीय जीवन शैली, खाजगी जीवन आणि व्यावसायिक जीवनामध्ये संतुलन साधणे, मानसिक शांती, आध्यात्मिक आरोग्य, सामाजिक व सांस्कृतिक जीवनशैली व सुप्रशासन हे हॅप्पीनेस निर्देशांक वाढविण्यासाठी आवश्यक असतात त्यासाठी ठाणे महानगरपालिकेने महत्त्वाचे उपक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे. यासाठी जगभरातील विविध शहरांचा अभ्यास केला असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जागतिक पातळीवर अवलंबिण्यात येणा-या Best Practices वर आधारित काही महत्त्वाचे उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

**ग्लोबल चॅलेंज फंड**

ठाणे शहरातील नवउद्योजकांसाठी निधी उभारण्यासाठी हा फंड निर्माण करण्यात येणार असून त्यामध्ये नावीण्यपूर्ण कल्पना असणाऱ्या सर्वोत्तम प्रस्तावांना निधी मिळवून देण्यासाठी महानगरपालिकेव्दारे मदत केली जाणार आहे. यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**सार्वजनिक व खाजगी शाळा भागीदारी**

खाजगी शाळा आणि महानगरपालिकेच्या शाळा यांच्यामध्ये असणारी बलस्थाने शोधून त्याचा उपयोग करुन शालेय मुलांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी सार्वजनिक व खाजगी शाळा भागीदारी प्रकल्प राबविणचे नियोजन असून त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**रेडिओ स्कूल**

शालेय मुलांच्या संवाद कौशल्यामध्ये सुधारणा करण्याकरिता शाळेअंतर्गत शाळेव्दारे चालविल्या जाणाऱ्या रेडिओ संकल्पनेव्दारे मुलांचा विकास करण्यासाठी रेडिओ विद्यालय संकल्पना राबविण्यात येणार असून त्यासाठी **रु.३० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

**सर्वांसाठी कौशल्य विकास**

व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर व्दारे कुशल कामगार व उद्योजक यांची निर्मिती करण्यासाठी **रु.२५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**रे ऑफ लाईट**

कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी विविध सुविधा असणाऱ्या वाहनाव्दारे वैद्यकीय सेवा पुरविल्या जाणार असून त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**क्षयरोग नियंत्रण वाहन**

विविध वैद्यकीय सेवा सुविधा असणाऱ्या वाहनाव्दारे क्षयरोगग्रस्त रुग्णांना सेवा पुरविल्या जाणार असून त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**समुपदेशन केंद्र**

नैराश्यग्रस्त व्यक्तीच्या मनात असलेले नैराश्य दूर करण्यासाठी समुपदेशन केंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित असून त्यामुळे आत्महत्या आणि तत्सम घटना कमी होतील त्यासाठी **रु. १ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**धूर विरहित केंद्र**

महापालिका हद्दीत होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय योजना म्हणून Smog Free Tower उभारण्यात येणार असून यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**समाज विकास आणि नागरिक केंद्रीत सुधारणा**

ठाणे शहरातील नागरिकांना होणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करुन केंद्रस्थानी असलेल्या नागरिकांच्या समुदायाचा विकास करण्यासाठी महानगरपालिकेच्या विविध योजनामध्ये यात बदल सुचविण्यासाठी नागरिक केंद्रीत व्यवस्था स्थापन करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**जी.आय.एस. सर्वे**

एकात्मिक GIS प्रणालीव्दारे महानगरपालिकेच्या विविध करांसाठी एकच प्लॅटफॉर्म तयार करुन नागरिकांना कर भरण्यास सुलभता यादी यासाठी सर्व मालमत्तांचे GIS सर्वे करण्याचे नियोजन असून त्यासाठी **रु.१५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**अनुकुल ट्रॅफिक व्यवस्थापन यंत्रणा (Adaptive Traffic Management System)**

वाहतूक व्यवस्थापन प्रणाली विकसित करुन प्रवाशांची वाहतूक सुलभ करण्यासाठी ही यंत्रणा राबविण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**डिजिटल मेसेजिंग सिस्टिम**

महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने नागरिकांपर्यंत विविध सूचना पोहोचविण्यासाठी सदर यंत्रणेची उभारणी करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी रक्कम **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### क्षयरुग्ण दत्तक योजना

ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण ३३०० रुग्ण क्षयरोगावर उपचार घेत आहेत. एका क्षयरोग रुग्णाच्या कुटुंबात एकूण ५ व्यक्ती गृहित धरुन दत्तक योजना राबविण्याचा महापालिकेचा मनोदय आहे. या कुटुंबातील सर्व सदस्यांची वेळोवेळी तपासणी करुन, भेटी देऊन, रुग्णास अथवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांना प्रति वर्षी सदर रुग्णापासून क्षयरोग या आजाराचा संसर्ग झाला किंवा कसे, यावर संपूर्ण नियंत्रण, देखरेख व आवश्यक त्या तपासण्या करुन घेण्यासाठी वार्षिक प्रति व्यक्ती रु.१००/- मासिक खर्च अपेक्षित आहे. सदरची योजना सामाजिक संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### कुटुंब सौख्य योजना

कुटुंब सौख्य योजनेतंर्गत गृहकलह मिटविण्यासाठी एका व्यक्तीसाठी ६ समुपदेशन बैठका घ्याव्या लागतात. प्रति बैठकीसाठी रु.५०० प्रमाणे ३०० व्यक्तींसाठी वार्षिक अंदाजित **रु.९ लक्ष** खर्च प्रस्तावित आहे.

### संपूर्ण लसीकरण करणा-या बालकांसाठी प्रोत्साहनपर अनुदान

० ते १४ वर्षे वयोगटातील बालकांचे संपूर्ण लसीकरण झाले असल्यास, प्रति बालक रु.१००० प्रोत्साहनपर अनुदान त्यांच्या पालकांना देण्याचे प्रस्तावित आहे.

### सुदृढ मातृत्व योजना

अति जोखमीच्या मातांच्या सुलभ प्रसुतीसाठी आवश्यक तपासण्या व औषधोपचारासाठी खर्च करण्यास व सदर योजना NGO मार्फत राबविण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### गर्भवती महिलांची सोनोग्राफी

महानगरपालिकेतील प्रसुतिगृहाकडे एका गर्भवती महिलेच्या ४ सोनोग्राफी (Anomaly Scan) करणे आवश्यक असतात. अंदाजित १०००० गर्भवती महिलांची एकूण चार वेळा सोनोग्राफी करण्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### प्रसुतिपूर्व बाळाच्या तपासण्या

बाळ गर्भात वाढत असताना मतिमंद बाळ जन्माला येऊ नये म्हणून बाळाच्या जनुकिय तपासण्या (Dual Marker Test) तसेच बाळ जन्माला

आल्यानंतर बाळामध्ये अनुवंशिकतेने येणारे विविध अनुवंशिक रोग याचे वेळीच निदान करण्यासाठी **रु.१ कोटी** प्रस्तावित करण्यात येत आहे.

### स्लिप स्टडी लॅब

निद्रानाश या मानसिक रोगामुळे निर्माण झालेल्या इनसोम्युनिया आजाराच्या तपासण्या केल्यास भविष्यात मानसिक रुग्ण निर्माण होण्यापुर्वीच उपचार होऊ शकतील त्यासाठी **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

### करदात्यांसाठी विमा योजना

महानगरपालिकेतील वर्षाचा मालमत्ता कर पहिल्या सहामाहीत एक रकमी आगावू भरणा-या करदात्या नागरिकांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना आधार म्हणून किमान रक्कम रु.१ लाखाचा विमा उतरविण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी रक्कम **रु.१ कोटी** तरतूद करण्यात येत आहे.

### वैद्यकीय सहाय्य योजना

दारिद्रय रेषेखालील ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाखा पेक्षा कमी असेल अशा व्यक्तींना ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील नामांकीत रुग्णालयात उपचार घेताना आर्थिक वैद्यकीय सहाय्य म्हणून एकुण बिलाच्या ५० टक्के अथवा जास्तीत जास्त रु.५० हजार देण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी वार्षिक किमान २००० कुटुंबास प्रथम वर्षी योजना लागू करण्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### किशोरवयीन मुलींना रुबेला लस

ठाणे महानगरपालिकेच्या शाळेतील अंदाजे १०००० व खाजगी शाळेतील अंदाजे १०००० अशा एकूण २०००० मुलींना प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून रुबेला लस देण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.१ कोटी** तरतूद केलेली आहे.

### राजमाता जिजाऊ बेटी बचाओ व बेटी पढाओ योजना

वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असलेल्या Two Child Norm पाळणा-या कुटुंबातील मुलींना जन्मापासून लसीकरण, शालेय शिक्षण, पदवी व विवाह अशी विविध स्तरावर आर्थिक सहकार्य करण्याच्या उद्देशाने सदरची योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. महापालिका क्षेत्रात वार्षिक साधारणता २७००० मुले जन्माला येतात. त्यापैकी ५० टक्के म्हणजे १३५०० मुलींना सदरची योजना लागू करण्यात येईल. प्रत्येक टप्प्यावर

रु.५,००० याप्रमाणे एका मुलीला तिच्या जन्मापासून विवाहापर्यंतच्या कालावधीत रु.२५ हजार आर्थिक अनुदान देण्यात येणार आहे. यामुळे मुलीच्या जन्माचे स्वागत व उत्तम आरोग्य, शिक्षण यास आधार मिळेल. सन २०१८-१९ साठी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**हिरकणी योजना**

ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व शासकीय, खाजगी कार्यालये, रेल्वे स्टेशन, बस स्टॉप, मॉल्स, इत्यादी ठिकाणी बाळाला वेळेवर स्तनपान करण्यासाठी विशेष कक्ष उपलब्ध करुन मिल्क बँक योजनेमधून दुधाची साठवणूक व पुरवठा करण्यासाठी हिरकणी योजना राबविण्याचे प्रस्तावित असून यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

प्रशासकीय कामकाज सुधारणा

ठाणे महानगरपालिकेच्या अभिलेख्यांपैकी जवळपास ५ कोटी कागदपत्रांचे स्कॅनिंग पूर्ण करण्यात आले असून ३.५६ कोटी कागदपत्रे ही Document management system वर अपलोड करण्यात आली आहेत. उर्वरीत जवळपास २.५० कोटी कागदपत्रांच्या स्कॅनिंगचे काम पुढील ३ महिन्यात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

महानगरपालिकेच्या मुख्यालयातील सर्व विभाग व प्रभाग समिती कार्यालये ISO प्रमाणित करण्याची कार्यवाही करण्यात येणार असून त्यासाठी अर्थसंकल्पात **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

ठाणे महापालिकेच्या क्षेत्रातील नागरी संशोधन केंद्राला विभागीय प्रशिक्षण केंद्र म्हणून विकसित करण्यात येणार असून या संस्थेमार्फत ठाणे शहरातील नागरिकांना तसेच शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात येईल. यासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

स्मार्ट सिटी प्रकल्प

स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत आतापर्यंत केंद्र शासनाकडून रु.१९० कोटी व राज्य शासनाकडून रु.९३ कोटी असे रु.२८३ कोटी प्राप्त झाले असून महानगरपालिकेने स्वत:चा हिस्सा म्हणून स्मार्ट सिटी योजनेकरीता सन २०१७-१८ पर्यंतचा रु.१५० कोटी निधी वर्ग केलेला असून सन २०१८-१९ चे **रु.५० कोटी** वर्ग करण्यासाठी तरतूद प्रस्तावित आहे.

या योजनेअंतर्गत आतापर्यंत रु.२३.२९ कोटी इतका खर्च झालेला असून मुख्यत्वेकरुन DigiThane प्रकल्प कार्यान्वित झालेला असून उर्वरित सर्व प्रकल्पांच्या प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून सर्व प्रकल्पांची कामे या वर्षी सुरु होतील.

**पंतप्रधान आवास योजना**

या योजनेअंतर्गत PPP माध्यमातून ३००० सदनिका बांधण्याचे प्रस्तावित असून अनुक्रमे केंद व राज्य शासनाकडून रु.१.५ लक्ष व रु.१ लक्ष याप्रमाणे एकूण २.५० लक्ष प्रति सदनिका अनुदान प्राप्त होणार आहे. तसेच खाजगी जागांवर मालक विकासकांच्या मदतीने या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**आभार**

भारताचे माननीय पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील स्वच्छ भारत मिशन, अमृत योजना, स्मार्ट सिटी योजना, सर्वांसाठी घरे योजना, सोलार सिटी योजना, राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना आणि अन्य योजनांच्या माध्यमातून ठाणे शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने जे योगदान दिले आहे त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री, ठाणे जिल्हयाचे मा.पालकमंत्री, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मा.खासदार, मा.आमदार, मा.मुख्य सविच, मा.पालक सचिव, मा.आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) नगर विकास विभागाचे मा.प्रधान सचिव व पाणी पुरवठा व स्वच्छता नगर विकास विभागाचे मा.प्रधान सचिव १ व २ तसेच मा. प्रधान सचिव (महसूल) तथा अध्यक्ष ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड व शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत धोरणात्मक निर्णय घेऊन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणि माझ्या सहकारी अधिका-यांना सतत प्रोत्साहित करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय मा.गटनेते, सर्व सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका, सर्व पक्षांचे लोकप्रतिनिधी यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

ठाणे शहरातील सर्व वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांचे पत्रकार, प्रतिनिधी यांनी महापालिकेच्या विविध योजनांना, धोरणांना सातत्याने सकारात्मक प्रसिध्दी देऊन सहकार्य केले त्याबद्दल त्यांचा विशेष आभारी आहे.

महानगरपालिकेच्या सर्व कामांच्या व योजनांच्या अंमलबजावणीसाठी सक्रिय सहभागी असलेले महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील चव्हाण (भा.प्र.से.), श्री. समीर उन्हाळे व सर्व विभागातील विभाग प्रमुख व अधिकारी आणि कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचे मी आभार मानतो.

महानगरपालिकेचा अर्थसंकल्प अहोरात्र काम करुन तयार केल्याबद्दल मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. सुधीर नाकाडी, सौ.अर्चना निपुर्ते, श्री.रुपेश पाटगावकर व लेखा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेही मी आभार मानतो.

सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे प्रस्तावित केलेल्या कामांना, प्रकल्पांना आणि धोरणांना मूर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर ठाणे महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टीने आपला सहभाग व सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिल्लकी अर्थसंकल्पीय अंदाज मा.महासभेस सादर करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

धन्यवाद.

**! जय हिंद !**

**संजीव जयस्वाल**
**महापालिका आयुक्त**